# ग्रामीण कादंबऱ्या व सांस्कृतिक पर्यावरण

डॉ. भाऊसाहेब दादासाहेब गव्हाणे
मराठी विभाग प्रमुख , सुभाष बाबुराव कुल महाविद्यालय ,
केडगाव,ता.दौड,जि.पुणे .

**प्रस्तावना :**

ग्रामीण कादंबरी ही लोकजीवनाच्या संस्काराने व्यापलेली आहे. कोणत्याही साहित्यामध्ये लोकांच्या कृती – उक्तीचा आविष्कार साकार होत असतो. या कृती–उक्तीबरोबरच, मानवी वृत्ती–प्रवृत्तीवरही साहित्याच्या माध्यमातून प्रकाश पडत असतो. लोकजीवनातील विविध प्रादेशिक परंपरा, रूढी, लोकसमज, देव, धर्म, श्रध्दा, अंधश्रध्दा इ. गोष्टींचा परामर्श ग्रामीण कादंबऱ्यांमध्ये येताना दिसतो. एकूण ग्रामीण साहित्यात शेती व खेडे तेथील व्यवसाय यांचे दर्शन घडत असते. याबाबत विश्वनाथ शिंदे म्हणतात, '' ग्रामीण साहित्यात खेडे हे केंद्र असते. ग्रामीण जीवन आणि आणि खेड्यातल्या माणसाच्या चित्रणाला ग्रामीण साहित्यात महत्व असते. ग्रामीण संस्कृतीचा तो साहित्याव्दारा झालेला आविष्कार असतो. ग्रामीण जीवन, खेड्याची रचना आणि संस्कृती, शहरी संस्कृतीपेक्षा भिन्न असते. हजारो वर्षांपासून चालत आलेल्या या ग्रामसंस्कृतीच्या केंद्रस्थानी शेती असते. आलुतेदार, बलुतेदार, मानकरी, कामदार, पाटील, कुलकर्णी, या सर्वांचे जीवन शेतीवर अवलंबून असते. वरील मत लक्षात घेतले तर ग्रामीणतेमध्ये खेडे व त्याच्या सभोवतालचे कृषीजीवन या संस्कृतीचा कणा असते. यातील कथा, कादंबरी, कविता अशा वाङमयप्रकारांमध्ये लोकजीवनाचा आविष्कार समोर येत असला तरी ग्रामीण कांदबरीचा लेखनपर मोठा असल्याने हे लोकजीवन सविस्तरपणे वाचकांसमोर येत असते. यातील पात्रांचे जीवन हे निसर्गसन्मुख असते. त्यांचे जीवन हे निसर्गाशी एकरूप झालेले दिसते. निसर्ग कधी मायेचा हात फिरवतो तर तोच निसर्ग रौद्ररूप धारण करतो. या सर्व गोष्टींचा या लोकमानसवर प्रभाव पडत असतो. दैवशरणता, सोशिक, संवेदनशीलवृत्ती, समाधानीवृत्ती या प्रवृत्ती या निसर्गातूनच त्याला शिकविल्या जातात असे म्हणणे उचित ठरते. ग्रामीण कादंबरीमध्ये रूढी, परंपरा याबरोबरच नवे प्रश्न, समस्या यांचे चित्रण अलिकडील साहित्यामध्ये येऊ लागले आहे.



ग्रामीण कादंबरीतील लोकमानस हे धर्मश्रध्देला मानणारे असते. ग्रामीण जीवनातील वेगवेगळे सण–उत्सव, जत्रा–यात्रा यांना धार्मिकतेचे वलय दिसून येते. मुळात महाराष्ट्र हीच संतांची भूमी आहे. या भूमीत अनेक धर्माच्या धर्मभावना रुजलेल्या दिसून येतात. या सर्वांनी एकून मराठी साहित्य समृध्द केलेले आहे. याबाबत डॉ. यु. म. पठाण म्हणतात, "अलीकडे जैन, ख्रिस्ती, वीर–शैव, मराठा, मुस्लिम, मराठी साहित्य संमेलने होऊ लागली आहेत. तो–तो प्रदेश व त्या प्रदेशाची भाषा एक असली तरी त्यात विविध धर्मांच्या, जातींच्या, पंथांच्या, आर्थिक स्तरांच्या लोकांची जीवनशैली, समस्या, व्यथा– विवंचना, अपेक्षा, आशा–आकांक्षा, धार्मिक चालीरीती–प्रथा व त्यामुळे त्यांच्या जीवनावर होणारे परिणाम इ. अनेक बाबी वेगवेगळ्याा असू शकतात आणि अशी विविधता असूनही त्या प्रदेशातील या प्रवाहांनी मिळून जो समाज सिध्द होतो, त्यात अनेक बाबी समानही असतात.'' (पृ.12) यातून सर्वधर्मसमभावाची भावना समाजात दिसून येते. यासाठी ग्रामीण भागात जाती–धर्माचे लोक एकत्र सण–उत्सव साजरे करताना दिसतात. ग्रामीण कादंबऱ्यामध्ये धार्मिकतेचे अनेक संदर्भ आलेले येतात.

'वावटळ' ही व्यंकटेश मांडगूळकर यांची गांधी वधानंतर झालेल्या होरपळीची वावटळ समाजात कशी आली याचे चित्रण येते. त्यात ब्राम्हण समाजाच्या घरांची जाळपोळ, लुटालूट आणि त्यातून मानवी मनाची झालेली तगमग येथे स्पष्ट दिसते. येथे धर्म, जात या गोष्टी ग्रामीणतेत भिनलेल्या आढळून येतात. जाती–धर्माच्या नावाने सत्ताकारण, राजकारण करणारे काही लोक व प्रवृत्ती ग्रामीणतेतही आढळून येतात. तर एक जात दूसऱ्या जातीला पाण्यात पाहते. कधी–कधी माणूसकीचाही प्रत्यय येऊन जातो. यातील महादा म्हणतो, "गावाच्या लोकास्नी अक्कल नाही. अरे तुमच्या सारख्या मूर्ती कशाला येतील ह्याा गावात ? ऑ ? चला माझ्या घरी. कोण काय करतेय ते बघू. तुमच्या केसाला धक्का तर

माझ्या प्रानाला धक्का. मग तिघेही पिशव्या उचलून महादा बरोबर चालू लागलो." (पृ.41) यामध्ये या महादू मधील माणूसकी स्पष्ट होते. धर्म हा शब्द शेजारधर्म, लोकधर्म, मानवधर्म यांनाही कवेत घेत असतो. ग्रामीण माणसांमध्ये धार्मिकता असल्याने आपोआप माणूसकीची, संवेदनशीलतेची भावना निर्माण होत जाते. वरील अवतरणातील मूर्ती हा शब्द देवत्वाचा साक्षात्कार करुन देतो कारण माणसांची मदत करणे हा धर्म शिकवण देत असतो. ग्रामीण भागात धर्माच्या नावाखाली अनिष्ट रूढीही कार्यरत असतात. मुस्लीम धर्माच्या पिराला नवस करून त्याला बकरे कापणे ही श्रध्दा धर्माच्या नावाखाली खपवली जाते. संतांचा धर्म पुर्णत्वाने ग्रामीण लोकमानसाने समजावून घेतला असे म्हणता येत नाही. धर्म हा समाजाची एक धारणा करताना करताना आढळतो.

'कोंडूरा' ही चिं. यं. खानोलकरांची ग्रामीण कादंबरी धर्म श्रध्दा जागविणारी दिसून येते. तेथील प्रादेशिक व पंचक्रोशीतील माणसांची या कोंडूऱ्यावर श्रध्दा आहे. परमेश्वराशी या कोंडुऱ्याचे नाते आहे अशी ही धार्मिक श्रध्दा दिसते. यातील पर्शराम तात्या याला या कोंडुऱ्याने एक दैवी शक्ती दिलेली आहे. अशी लोकमानसातील श्रध्दा आहे. यामुळे या साध्या माणसाचे पूर्ण आयुष्यच बदलून जाते. सुरूवातीला विष्णुदादाशी भांडून तात्या मुंबईला जायला निघतो त्याला नोकरी करून स्थिर जीवन जगण्याची इच्छा असते. वाटेत त्याला एक जोगी भेटतो तो त्याला एक मुळी देतो. तो कोंडुराचा असावा अशी त्याची श्रध्दा आहे. हा जोगी पर्शरामतात्याला म्हणतो, "लेकरा, ही मुळी म्हणजे महान मंत्रासारखी औषधी आहे. हिने गर्भ जिरवता येतो. हिचे फक्त सात फेरे थंडगार पाण्यातून झरवून द्यायचे. गर्भाचे पाणी होईल जाईल. जा तुझ नाव आहे वर. योग्य तऱ्हेनं उपयोग कर आाणि ब्रम्हचर्य पाळ! ब्रम्हचर्य पाळ! जोगी मागं न पाहता भराभर पावलं उचलीत निघाला." या कादंबरीतील कोंडुऱ्याचा आशिर्वाद घेऊन ढोंगी साधुचे प्रतिनिधीत्व करतो. वेंगुर्ला परिसरातील एका खेडे गावातील लोकसंस्कृती, लोकपरंपरा यांचे चित्रण येथे घडते. ग्रामीण भागातील वेगवेगळया वृत्ती–प्रवृत्तीची माणसे येथे दिसून येतात. ही धार्मिक वृत्तीने वागणारी माणसे माणसाला देव मानतात. परंतू या मानसांचे विश्व अंधश्रध्दा यांनी परिपुर्ण दिसते. विष्णूदादा, वहिनी, अनुसया,म्हतारी ही माणसे ग्रामीण भागातील माणसे धार्मिक अंगाने व श्रध्देने परंपरेकडे पहात आलेली आहेत हेच यातून स्पष्ट होते. याबाबत डॉ. वासुदेव मुलादे म्हणतात, "खेडयातील माणुस हा सामान्यपणे धार्मिक असतो. म्हणून येथे धर्माला, धर्मविषयक भावनेला अधिक प्राधान्य असते. यामुळे येथे श्रध्देला, ईश्वर विषयक कल्पनेला अधिक स्थान आहे. ईश्वराच्या अस्तित्वाविषयीच्या अतिवास्तव श्रध्देमूळेच तो अंधश्रध्दही आहे.या अंधश्रध्देतून नवस–सायास, बळी देण्याची कल्पना पुढे आली." कोणताही धर्म हा माणसाला सर्वश्रेष्ठ मूल्य देणारा असतो. त्यामुळे माणूस हा धर्माचा मुख्य आधार आहे. यामध्ये ग्रामीण माणूस हा विशेष दिसून येतो कारण त्याचे विधी हे सकाळी उठल्यापासुन सुरू होतात. सकाळी उठल्या–उठल्या तो देवाचे नामस्मरण करतो. ताट समोर आल्यावर त्याच्या पाया पडतो. सणाच्या दिवशी पहिला नैवदय देवाला दिला जातो. यातून त्याची दैववादी घडण तयार होत असते. या श्रद्धेतून कधी–कधी अंधश्रद्धेलाही पाठबळ मिळत असते.ग्रामीण कादंबरीतील लोकपरंपरा काही ग्रामीण कादंबऱ्यांतून दिसून येतात.

ग्रामीण संस्कृतीमध्ये लोकतत्वाचा प्राचीन खुणा रूढ परंपरेने पुढे आलेल्या दिसतात. कृषीविषयक कर्म करताना हे ग्रामीण लोकमानस अनेक विधी करत असते. पेरणी करावयाची असेल तर या भूमी देवतेला प्रसन्न करण्यासाठी नारळ फोडला जातो. कारण ही धरणी अनेक हातांनी भरभरून देत असते असा त्यांचा विश्वास आहे. ग्रामीण संस्कृतीतील शेणाने सारवलेल्या खळयाला खळे देखील देवत्व प्राप्त होत असते. हे सर्व विधी ग्रामीण आचार–विचारांचे व लोकसमुहातुन निर्माण होणारे लोकतत्त्व दिसते. हे धान्य घरातील धनलक्ष्मी असते. एका दाण्यातून लाखो दाणे देण्याचे भू–मातेची सृजनशीलता हे या धारणेमागील लोकतत्त्व दिसून येते. धार्मिक सण– उत्सवांमध्ये ग्रामदेवतेला पूजले जाते. त्याचा आशिर्वाद घेतला जातो.

'जैत रे जैत' ही गो. नी. दांडेकरांची आदिवासी जीवनावरील कादंबरीमध्ये ठाकर समाजातील आचार–विचार वास्तवतेने समोर येतात. यातील अशिक्षित नाग्या पुण्य कमवायला निघाला आहे. यातून ग्रामीण माणसामध्ये असणारे पाप–पुण्य कल्पना दिसून येतात. ही ठाकरवाडी एक आदिवासी जीवन प्रकट करते. यातील नाग्या–चिंधी हे परंपरेचे पाईक आहेत. त्यांच्या देखील काही आचार–विचारांच्या श्रद्धा ठरलेल्या आहेत. नाग्याचा बा नाग्याला म्हणतो, ''आमुष्याच्या दिवशी द्येव मावळल्यावर जेवायचं नही, जेवायचं नही. म्होर ? रोज आंघोळ–पांघुळ करायची. पाक ऱ्हायचं. पराया बाईबापडीकडे पघायचं नाही. खोटं कंदीं बोलायचं नही. झाडाचं हिरवं फळ तोडायचं नही. हिरव्या झाडावर कुऱ्हाड कोयती चालवायची नही. घुघु मन् कावळा खायचा नही. लई साधना होय''(पृ 15) असे काही आचार–विचार या ठाकरवडीतील नाग्याला शिकवले जातात. पाप–पुण्य, स्वर्ग–नरक या काही प्राचीन लोकमानसातील श्रद्धा आहेत याचे ही प्रत्यंतर अशा कादंबरीतून येत आहे. यातील नाग्याचा जिज्ञासू स्वभाव ,पुण्याची संकल्पना समजून घेण्याचा प्रयत्न करतो. याबत तो जोश्याला विचारतो, ''बाम्हना! पुन्ये म्हंजी काय? जोष्याला हबकाच बसला त्याला वाटलं होतं, की हे ठाकरच पोर आता तंबाखू मागणार सुई आहे का म्हणून चौकशी करणार गेला बाजार कुण्या दुखण्यावरचं औषधे विचारणार पण नाग्यानं हे जगावेगळंच केलं. बोंबलाच्या बाजारात मोगरीच्या फुलांचा वारा आढळावा तसं झालं हे''(पृ45) यातून ग्रामीण जीवनात आचार–विचार पक्के असतात हे स्पष्ट होते.

'सर्जा' ही सुरेश पां. शिंदे यांची एका मुक्या जनावराचे दुःख प्रकट करणारी कादंबरी ग्रामीण कादबरीतील आचार–विचारांचा विचार करताना असे दिसते की येथील लोकमानस एक भूतदयावादी विचाराने गुंफलेलीही असू शकते. कोणतीही साहित्यकृती ही तथील प्रदेशाचे व लोकसंस्काराचे रुप घेऊनच अवतरते, त्यात आचार–विचारांचा ही समावेश असतो. सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ तेन याने साहित्याचे सामाजिक रुप सांगताना म्हटले आहे की, ''वाङमयीनकृती ही केवळ कल्पनाविलास नसते, खवळून उठलेल्या गरमागरम मेंदूची एकाकी लहर नसते ती असते समकालीन आचार विचारांचे चित्रण, विशिष्ट मनोव्यापाचे प्रतिनिधिक चित्रण! (A literary work is not a mere play of imagination, the solitary caprice of a heated brain, but a transcript of contemporary manners, a type of certain kind of mind ) वरील अरूण टिकेकर यांनी उदधृत केलेले तेन यांचे मत विचारात घेतल्यास असे लक्षात येते की, हे कल्पना नसले तर त्या साहित्यिकाच्या मनोविश्वाचे आकार घेतलेले चित्र असते. कुठेतरी हे अनुभवबीज त्याच्या संस्कारशील मनात पडलेले असते. त्या काळातील आचार–विचारांबरोबरच त्या परिसराचा आणि त्या निर्मात्याच्या विशिष्ट संस्कराचा प्रभाव त्या कलाकृतीवर दिसतो. 'सर्जा' कादंबरीतील ज्ञानबा पाटील आपल्या सर्जा नावाच्या बैलाला जीवापाड जपतो आहे. शेतकरी विश्वात जनावरे, बैल व इतर प्राणी यांना त्यांच्या विचारात वेगळे स्थान आहे. येथे वर्णन येते ते असे, ''हया सर्जाबरोबर ज्ञानबाची मुलगी मंगी देखील वयाने वाढत होती. सर्ज्याच्या पायगुणाने मंगीला पाहुणे बघायला आले होते. त्या बैठकीतच मंगीच्या लग्नाची सुपारी फोडली व लग्नाचे पक्के झाले. शेतीच्या कामासाठी ज्ञानबाने

सर्ज्याला जुंपण्याची सवय सुरू केली.'' यातील हे वर्णन पाहताना असे लक्षात येते की, येथील लोकमानस या मुक्या प्राण्यांना आपल्या मुलाप्रमाणे वाढवते आहे. तसेच येथील मंगी आणि सर्जा यांचा एकाच पातळीवर विचार येऊन जातो. सर्ज्याचा देखणेपणा मानवाच्या पातळीवर जाऊन पोहचते. एखाद्याची संपत्ती ही पूर्वी त्यांच्या जमीन–जुमला याबरोबरच जनावरे व इतर लवाजमा यावरून ठरवली जात असे.

'चक्र' ही जयवंत दळवी यांची कादंबरी झोपडपट्टीतील प्रादेशिक जीवन प्रकट करीत असली तरी त्यातील लोकांच्यामध्ये अनेक आचार–विचारांचे वैविध्य दिसून येते. हे नियतीचे चक्र ग्रामीणतेला व्यापुन टाकते आहे. जन्माला आलेल्या माणसाला कधी तरी जावेच लागते. यातून एक कोकणी परीसर आपल्या डोळयासमोरून जातो. या कादंबरीतील बेन्वा हे पात्र आपली भावना प्रकट करते. ''तिरडी बांधताना पुनः त्यांच काळीज लखलखाल्या सारखं झालं. सुंभाला गुंडाळा सोडून तिरडी बांधताना त्याला आठवलं पून्नानं आपल्या जीर्ण बाजेसाठी सुंभ आणायला सांगितलं होत. ते काही त्याला आपण कधी आणून दिलं नाही. एवढसं सुंभ ते काय? आता आणलच ना? पण त्यानं मागितले तेव्हा देता आलं नाही.'' यातील आचार लक्षात घेताना मनुष्य मेल्यावर त्याची इच्छा पूर्ण केली पाहिजे हा विचार येऊन जातो. जिवंतपणी माणसाने माणूसकी जपली पाहीजे हा लोकविश्वासातील संकेत येथे येतो. 'तिरडी' हा लोकजीवनातील शब्द माणसाचा शेवट दर्शवित असला तरी या तिरडीवरून प्रत्येकालाच जायचे आहे हे ही शाश्वत सत्य माणसांना माहिती असते. या कादंबरी संदर्भात पुष्पलता राजापुरे – तापस भूमिका मांडताना म्हणतात, ''या कादंबरीचा निवेदक मराठी वाचकाला अपरिचित अशा समाजजीवनाचे भेदक व प्रगल्भ असे दर्शन घडवितो. माणूस म्हणून जन्माला आलेल्या व्यक्तीला माणसांसारखे मोकळे आणि स्वेच्छापूर्ण आयुष्य जगता येत नाही. तिला अपुऱ्या अन्न,वस्त्रावर व अपुऱ्या निवाऱ्यावर जगावे लागते. या साऱ्या अपुरेपणामुळे पुर्णपणे जगण्यासाठी जी जीवघेणी धडपड प्रत्येकाला करावी लागते. त्या धडपडीत त्याच्या 'माणूसपणाचाही ऱ्हास होत जातो. ग्रामीणतेतील माणूसकी, त्यांच्या मनाचा मोकळेपण स्पष्ट होत असली तरी त्याला परिस्थिती ही मोकळे आयुष्य सुखाने जगु देत नाही. हा मानवी आचार–विचारांना एक अडथळा ही निर्माण होऊ शकतो. कोणतीही कादंबरीही विशिष्ट प्रादेशिक परिघात वावरत असते.तेथील भावना, मनोविश्व, लोकविश्वास हा त्या प्रदेशात संस्कारावर आधारित दिसून येतात.

लोकसंस्कृतीमध्ये लोकजीवनाचा आविष्कार हा अपरिहार्यपणे येत असतो. समाजामध्ये वावरत असताना अनेक नीतिनियम पाळावे लागतात. मनुष्य लहानपणापासून 'नेहमी खरे बोलावे आपले आचरण' शुद्ध असावे, कोणालाही वाईट बोलू नये, वाईट माणसाशी संगत करू नये, अशी अनेक विचारांचे मंथन ऐकत आला आहे. ग्रामीण कादंबरीमध्ये कुटुंब हे समुह भावनेने एकवटलेले असते. कुटुंबातील एकमेकांना एकमेकांशी एका कौटुंबिक भावना जपत जगायचे असते हे जणु विधिलिखीत संस्कार या शेतकरी कुटुंबावर झालेले दिसुन येतात. आई–वडील, भाऊ–बहीण,काका–पुतणे, आजी–आजोबा इ. अनेक नात्यांनी आधार दिला पाहिजे.दुसऱ्याचा आदर करायला लावणारी नीति ग्रामीणतेत दिसून येते. एखादी ज्वारीची पेंढी ज्यावेळी बांधली जाते.त्यावेळी सर्व ताटे एकत्र असतात. मात्र त्यात बांधलेले ताट निसटले तर संपुर्ण पेंढी ही अस्ताव्यस्त होते. त्याप्रमाणे जापर्यंत आई–वडील आहेत तोपर्यंत कुटुंब एकत्रितपणे बांधलेले असते असे म्हणता येते. नीति ही माणसाला सामाजिक भान आणून देत असते असे म्हणता येते. ग्रामीण भागात लोकमानस हे धार्मिक असल्याने पाप–पुण्य, स्वर्ग–नरक, मोक्ष, धर्म अशा संकल्पना पुढे आलेले आहेत. वाईट केले तर नरक, चांगले कले तर स्वर्ग, धर्माने वागले तर मोक्ष असे काही धार्मिक नीतिनियम हे लोकमानस मानत असते. त्यातून त्याची मानसिक घडण तयार झालेली असते. याबाबत डॉ. गंगाधर मोरजे म्हणतात, '' लोकसाहित्याच्या निर्मितीमागे धार्मिक, सामाजिक, विधीचे प्रारंभ काळात अधिष्ठान हाते. असा लोकसाहित्याचे सारे अभ्यासक अंदाज करतात. मानवीसमुह अनेक सामाजिक नीतीनियमांनी जवळ येतो. समुहरूपाने संघटित राहतो. सुरूवातीला अशा सामाजिक नीतीनियमांने एकत्र येणे म्हणजे एकमेकांना धरून राहणे, हे धर्माचे आवश्यक अपरिहार्य अधिष्ठान होते. हळूहळू कोणत्यातरी धार्मिक, आत्मिक श्रध्दांना माणसे जवळ यायला लागली. वरील मतानुसार विचार करता असे लक्षात येते की, धार्मिकता हा ग्रामसंस्कृतीतील महत्वाचा व अविभाज्य घटक दिसून येतो. प्राचीन काळामध्ये आर्य व आर्येत्तर हे बहूजन समाजाचे प्रतिनिधीत्व करत होते असे म्हणावे लागेल असे वाटते. अनेक मानव मिळून समूह व समूहाची एक सामाजिक संस्कृती निर्माण होत असते. धर्मभावना ही ग्रामीण कादंबरीमध्ये वेळोवेळी डोकावताना दिसते. मुळात ग्रामीण कादंबरी ही एका विशिष्ट लोकसमूहाचे प्रतिनिधीत्व करत असते. जेवढा लोकसमूह लहान तेवढे तेथील सामाजिक नीतिनियम हे प्रकर्शाने जाणवत असतात.

'रानखळगी' ही भीमराव वाघचौरे यांची ग्रामीण कादंबरी एक कुटूंबाचे वास्तव्य विश्व डोळ्यासमोर साकार करते. यातील 'दामा' नावाच्या नायकाची आई नवऱ्याच्या खांद्याला खांदा लावून काम करते. दामावर माया करते. सासूला जवळ करते. दामाच्या शिक्षणासाठी दावणीची गाय विकते. ती विकण्यापूर्वी तिची पुजा करते. आपल्या कुटूंबावर प्रेम करणारी आई येथे दिसून येते. ग्रामीण कुटूंबातील नीतिमानता या ठिकाणी दिसून येते. यातील आप्पा त्याच्या आईला म्हणतात, "आये, आफल्या माघच्या पिढ्याला कवा शाळा माहीत व्हती का गं? न्हवती ना? आन् मंग निदान हो येवढं पोर शिकलं, मोठं झाल कायी नाव कमवलं तर कुठं बिघडतं. आसं मला तर लइ वाटंत बघ! म्हून म्या इचारच करून ठिकला  की, कायीबी झालं तरी येवढं पोर शिकवायचं.त्याला कायीच असे कामं सांगायचे न्हायीत.निस्तं आब्यासावर ठिकायचं. त्येच्यासाठी कितीबी अन् कायीबी काम पडंल तरी करायला तयार हाय''... (पृ 21) यातील आप्पा हा सनातनी संस्काराचा असला तरी आधुनिक विचारातील आपलेपणा त्याला जवळचा वाटतो आहे. एवढा शिक्षणाचा संस्कार दामावर व्हावा हा माफक व नीतिमान विचार वास्तवतेने प्रकट होतो. आपल्या पुढील पिढीसाठी कोणतेही कष्ट करण्याची सहनशीलता येथे दिसून येते. ग्रामीण लोकमानसातील एक महत्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे त्याची संवेदनशील आणि नीतिमानता असे म्हणावे लागते. आपल्या पुढच्या पिढीने सुसंसकारीत व्हावे कमवावे, नोकरी–धंदा करावा हीच माफक अपेक्षा या ग्रामीण लोकमानसाची असते. हे आचार, नीतिकल्पना, रूढी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असतात. त्यामध्ये परंपरेने काही बदलही संभवू शकतात. ग्रामीण कादंबरीमध्ये समुहमन कार्यरत असल्याने त्यातील समूह हा विशिष्ट लोकधारणांनी, नीति कल्पनांनी एकत्रपणे गुंफलेला दिसून येतो. यातील लोकसमजुती, लोककथा, लोकगीते, म्हणी, वाक्प्रचार हे नीति नियमांच्या परिघातच तयार होत असतात. ग्रामीण संस्कृती किंवा एकुण संस्कृती ही मातृदेवभवः पितृदेवभवः अतिथीदेवभवः गुरूर्ब्रम्हा–गुरूर्विष्णू, गुरूर्देवो महेश्वरः या सर्वसंकल्पना स्थान देणारी दिसून येते. हा लोकसंस्कृतीचा अमोल ठेवा संरक्षित करण्याचे व विकसित करण्याचे काम हा ग्रामीण समाज करीत असतो. मध्ययुगीन साहित्यातील संतांचे अंभंगातून नितीमत्तेविषयी अनेक उदाहरणे दिसून येतात. याबाबत भास्कर शेळके म्हणतात, "तुका आकांशा एवढा का? असा प्रश्न विनाकारण नाही. देवाशी भांडणारा, वाईट" झाल्यास समाधान मानणारा, देवपण नको, माणूसच देव म्हणणारा तुकोबा बुवाबाजी, ढोंगीपणाचा निषेध करतो, विश्वशांतीचा संदेश देतो. शब्दाशब्दात जनकल्याणाची तळमळ भरलेली आहे. लोकबोलीत लोकांशी त्यांनी अभंगातून संवाद साधला म्हणून निरक्षर माणसांना तुकोबांचे अभंग

मुखोद्गत आहेत. गाथा इंद्रायणीच्या डोहात तरली. याचाच अर्थ असा की, ती भक्तांच्या ह्रदयात घर करून आहे. लोकांच्या बोलीतील, शब्दातील हे जीवनमुल्यांचे संस्कार आहेत. हाच वारसा घेऊन ग्रामीण कादंबरीतील लोकमानस आजही जगताना दिसते आहे. ग्रामीण कादंबरीतील भाषावैभव हे ग्रामीणत्त्वाचा एक महत्त्वाचा विशेष दिसतो आहे. ग्रामिण समाजातील मुख्य व्यवसाय शेती असल्याने शेतीच्या अनुषंगााने येथील लोकमानस फिरते आहे. धार्मिकता हे ग्रामीणत्वाचे महत्त्वाचे अंग दिसून येते. ग्रामीण कादंबरीमध्ये नीतिमानता नसानसात भिनलेली आहे. कारण आचार–विचारांमध्ये धर्म, जात, परंपरा या गोष्टी प्रकर्शाने जाणवत असतात. मानुसकी, संवेदनशीलता, आदरातिथ्य, देव, भक्ती या गोष्टी रूढी परंपरेने लोकमानसात गुंतलेल्या आहेत. सत्य वचन बोलणे, शब्दाला किंमत देणे, दिलेला शब्द पाळणे या गोष्टीतून एक ग्रामीण लोकांचे व्यक्तिमत्व निर्माण होताना आढळते.

लोकसंस्कृतीमध्ये लोकविश्वास, समज, रूढी परंपरा या गोष्टी महत्त्वाच्या असतात. अंधश्रध्देला फार प्राचीन परंपरा असलेली दिसते. ग्रामीण लोकमानसामध्ये अनेक लोकतत्वे लपलेली आहेत. यातील बरीच लोकतत्वे ही श्रध्दा, अंधश्रध्देतून आलेली दिसून येतात. देवाची भक्ती करणे ही श्रध्दा आहे परंतू या श्रध्देचे अवडंबर झाले की, ही श्रध्दा अंधश्रध्देचे रूप धारण करीत असते. श्रध्दा ज्यावेळी अंधतेचे रूप धारण करते त्यामुळे अंधश्रध्दा निर्माण होत असते. ग्रामीण संस्कृती ही कृषीकेंद्रीत दृष्टीला जवळ करणारी आहे. येथील जीवन व्यवहार शेतीच्या अनुषंगाने चाललेले असतात. भारत हा खेड्याांचा देश आहे असे म्हटले जाते. या खेड्याात जो राहतो तो खेडूत आहे. या ग्रामजीवनात राहणारा खेडूत श्रध्दाळू तसेच अंधश्रध्दाळू आहे. यातून तो पापभिरू मानसिकतेला जवळ करणारा आहे. एखादय्ाा दगडाला शेंदूर फासून त्याच्यात दैवत्व निर्माण करणारे हे लोकमानस पाप–पुण्य या संकल्पना मानणारे असते. पूजलेला धोंडा फेकून देण्याची अथवा त्याची मुर्ती उचलण्याची, फेकून देण्याची हिम्मत होत नाही. येथील जीवनशैली ही शेतीला पूरक अशीच दिसते.

### *संदर्भ ग्रंथ*

1) लोकसाहित्य मीमांसा (भाग दुसरा)– विश्वनाथ शिंदे, स्नेहवर्धन, प्र.आ 2004
2) ललित – सु. रा. चुनेकर, मार्च,1975
3) वावटळ – व्यंकटेश माडगुळकर, उत्कर्ष, 1985
4) कोंडुरा – चिं. त्र्यं खानोलकर, मौज, 1966
5) साहित्याचा अन्वयार्थ – नागनाथ कोत्तापल्ले, मेहता,1965
6) जैत रे जैत – चिं. त्र्यं. खनोलकर, कॉन्टीनेंटल,1965
7) सर्जा – सुरेश. पा. शिंदे, कॉन्टीनेंटल, 1996
8) विशाखा, एस एस कानडजे, 1987
9) चक्र – जयवंत दळवी, मॅजेस्टिक, 1963
10) रानखळगी – भीमराव वाघचौरे, साकेत, 1988